# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 26-09-2025

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये रामटेक ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-09-26 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2025-09-27 | 2025-09-28 | 2025-09-29 | 2025-09-30 | 2025-10-01 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 15.4 | 27 | 10.5 | 3.3 | 8.3 |
| कमाल तापमान (अं.से) | 30.2 | 28.2 | 27.9 | 28.5 | 28.6 |
| किमान तापमान (अं.से) | 24 | 23.9 | 23.4 | 23.1 | 23.2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 94.7 | 96.8 | 97.8 | 97.8 | 96.2 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 74.1 | 77.8 | 80.5 | 76.4 | 73.8 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 9.3 | 8.9 | 7.6 | 2.3 | 0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 13.5 | 49.9 | 84.6 | 141.4 | 360 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 8 | 7 | 7 | 7 |

### हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २७ सप्टेंबर ते ०१ ऑक्टोबर २०२५ दरम्यान आकाश आंशिक ते मुख्यतः ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक २७ आणि २९ सप्टेंबर व ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक २७, २८, २९ आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. • दर्भामध्ये पुढील ५ दिवसामध्ये कमाल तापमानात फारसा बदल होणार नाही. • विस्तारित स्वरूपाच्या अंदाज प्रणालीनुसार विदर्भामध्ये दिनांक ०१ ते ०७ ऑक्टोबर २०२५ दरम्यान सरासरी पेक्षा जास्त पाऊस होण्याची शक्यता, तर कमाल तापमान मध्यमतः सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी एवढे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### कृषि सल्ला:

• पावसाचा अंदाज लक्षात घेता परिपक्व अवस्थेतील उडीद, मुग इत्यादी पिकाची कापणी व मळणीची कामे लवकरात लवकर उरकावी. • पावसाची, मेघगर्जना, विजांचा कडकडाट होण्याची शक्यता लक्षात घेता, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे, उभ्या पिकात खते देण्याची कामे तसेच आंतरमशागतीची (खुरपणी/डवरणी इत्यादी.) कामे पुढील २ दिवसामध्ये उरकून घ्यावी व त्यानंतर पुढे ढकलावी. • अत्यावश्यक कृषी रसायनांच्या फवारणीची कामे पावसाच्या उघडिपीनंतर स्थानिक स्वच्छ व शांत हवामान परीस्थिती असताना करावी. • कपाशी, तूर, सोयाबीन, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये, पावसाची शक्यता लक्षात घेता, सऱ्या फोडाव्या तसेच पिक क्षेत्रामध्ये पावसाचे पाणी दीर्घकाळ साचून राहू नये यासाठी निचरा करावा. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतर पाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

### संक्षिप्त संदेश सल्ला:

